श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

एप्रिल २०२२ | वर्ष – १०, अंक – ५ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४

## डेरवण येथे आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा

दरवर्षी ८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. महिलादिनानिमित्त भ. क. ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज आणि नर्सिंग कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्यात आला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे शीर्षक 'एक शाश्वत उद्यासाठी – आज लैंगिक समानता' असे होते, महिलांसाठी ड्रेस कोड जांभळा, हिरवा आणि पांढरा आंतरराष्ट्रीय महिला दिनचा रंग होता, जो न्याय आणि प्रतिष्ठा, आशा आणि शुद्धतेचे प्रतीक आहे. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली आणि त्यानंतर डॉ. निवेदिता केतकर यांनी आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा परिचय व ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. या कार्यक्रमाला वैद्यकीय महाविद्यालय आणि नर्सिंग आणि फिजिओथेरपी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम सामुदायिक औषध विभागातर्फे आयोजित करण्यात आला होता.



*डॉ. एन. के. शर्मा दीपप्रज्वलन करताना*



*डॉ. निवेदिता केतकर दीपप्रज्वलन करताना*




*डॉ. सुनीता पाटील (प्रोफेसर, फार्माकोलॉजी) भ. क. ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज या व्याख्यान देताना*



*डॉ. सी. मैत्रा (प्रोफेसर, फिजिओलॉजी), भ. क. ल. वालावलकर रुरल मेडिकल कॉलेज - व्याख्यान देताना*



*समर्थ नर्सिंग कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा*

# स्तनाचा कर्करोग - आंतरराष्ट्रीय कार्यशाळा

'स्तनाचा कर्करोग' ह्या विषयावर डॉ. अमर देशपांडे (एफ. आर. सी. एस. - इंग्लंड, ऑंकोप्लास्टिक ब्रेस्ट सर्जन) व वालावलकर रुग्णालयातील डॉ. अभय देसाई व डॉ. संजीव पाटणकर यांच्या मार्गदर्शनाखाली मेडिकल कॉलेज आणि शालेय वैद्यकीय विद्यार्थ्यांना दि. ८. ३. २०२२ ते १०. ३. २०२२ हे तीन दिवस शस्त्रक्रिया, प्रात्यक्षिक, व्याख्याने आयोजित करून मार्गदर्शन करण्यात आले



*डॉ. अमर देशपांडे व्याख्यान देताना*




*डावीकडून - डॉ. अभय देसाई, डॉ. अमर देशपांडे, डॉ. माधवी देशपांडे, डॉ. संजीव पाटणकर व सर्जरीची टीम*



*डावीकडून - डॉ. सुरज हरनाळे, डॉ. ओंकार सांगडे, डॉ. खुशबू, डॉ. दीपक शिंदे, डॉ. अमर देशपांडे, डॉ. स्वप्नील निकम, डॉ. ऋषभ बोथरा, डॉ. रतन*

# मैदानी स्पर्धा

‘एसव्हीजेसीटी’च्या सिंथेटिक ट्रॅकवर प्रशिक्षक अविनाश पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुमारे ८० मुलांचा संघ विविध क्रीडा प्रकारांचा नियमित सराव करतो. गेले तीन वर्षे कसून केलेल्या सरावाचा आता फायदा दिसू लागला आहे. त्यांनी विविध स्पर्धांमध्ये केलेल्या समाधानकारक कामगिरीचा हा आढावा



दिनांक १ मार्च २०२२ रोजी चिपळूण येथे आयोजित केलेल्या ‘आमदार चषक भव्य मॅरेथॉन स्पर्धे’मध्ये ‘एसव्हीजेसीटी’ क्रीडासंकुलातील ओंकार बैकर या खेळाडूने १९ वर्षाखालील वयोगटात १० किमी धावण्याच्या स्पर्धेत ३१.१५ मि. वेळ नोंदवून प्रथम क्रमांक पटकाविला, तसेच सिद्धेश बरजे याने ३१.५८ मि. वेळ देऊन द्वितीय क्रमांक पटकाविला. १९ वर्षाखालील महिला गटामध्ये खुशी हसे हिने ४१.१२ मि. या वेळेत द्वितीय क्रमांक पटकाविला.

१६ वर्षाखालील मुले या गटामध्ये स्वराज जोशी याने ८.४० मि. या विक्रमी वेळेत सुवर्णपदक पटकावले. तसेच



भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



श्रेयस ओकटे याने द्वितीय क्रमांक (०९.४८ मि.) आणि प्रतिक बडदे याने तृतीय क्रमांक (१०.०९ मि.) मिळवून ही स्पर्धा पार पाडली.

दिनांक ६ मार्च २०२२ रोजी रत्नागिरी येथे 'जे. एस. डब्ल्यू.' यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या भव्य मॅराथॉन स्पर्धेमध्ये १० कि. मी. १९ वर्षांखालील गटात सिद्धेश बरजे या खेळाडूने ३१.१५ मि. अशी वेळ नोंदवत सुवर्णपदक मिळविले. तसेच संदीप जोयशी याने तृतीय क्रमांक तर ऋतुराज घाणेकर याने चतुर्थ क्रमांक पटकाविला. तसेच १९ वर्षाखालील महिला गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावून साक्षी जड्याळ हिने ३९.१२ मिनिटांमध्ये ही स्पर्धा पार पाडली.

१८ वर्षाखालील मुले ५ कि. मी. गटामध्ये प्रथम क्रमांक ऋतुराज हुमणे, द्वितीय क्रमांक तुषार बेचावडे तसेच १८ वर्षाखालील मुली ५ कि. मी. गटात प्रथम क्रमांक खुशी हसे हिने पटकाविला. १६ वर्षाखालील मुले ३ कि. मी. या गटामध्ये स्वराज जोशी, समर्थ सांडील आणि श्रेयस ओकटे यांना अनुक्रमे सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक देऊन गौरविण्यात आले.

दि. १० एप्रिल २०२२ रोजी महाड येथे मॅराथॉन स्पर्धेमध्ये 'एसव्हीजेसीटी' क्रीडासंकुलातील खुशी हसे हिने २ कि. मी. ही स्पर्धा ६.४५ मिनिटामध्ये पार पाडून द्वितीय क्रमांक पटकाविला. तसेच साक्षी जड्याळ हिने ६.५० मिनिटांमध्ये ही स्पर्धा पूर्ण करून तृतीय क्रमांक मिळविला.

१९ वर्षांखालील मुले वयोगटात स्वराज जोशी याला २ कि.मी. स्पर्धेत द्वितीय क्रमांकचे रौप्यपदक मिळाले. त्याने ५.५५ मि. अशी वेळ नोंदविली.

कोकणातील खेळाडू हा आतापर्यंत मैदानी स्पर्धांमध्ये चमक दाखवू शकत नव्हता, परंतु आता डेरवण येथील मैदान आणि सिंथेटिक ट्रॅक हा खेळाडूंना सरावासाठी नेहमीच उपलब्ध असतो. मुंबई, पुणे, नाशिक येथून खेळाडू आणि तज्ज्ञ मार्गदर्शक येथे येऊन सराव करीत असतात. स्थानिक खेळाडूंना त्यांच्याकडून अधिक सराव करण्यासाठी प्रोत्साहन मिळते आणि नवीन सराव तंत्रेही अनुभवायला मिळतात. त्यामुळेच येथील खेळाडू आता प्रगल्भ होत चालले आहेत. भविष्यात येथील मैदानावर सर्वच क्रीडाप्रकारांमध्ये खेळाडूंचे संघ सराव करताना दिसतील आणि त्यासाठी संस्थेचे उत्तम मैदान आणि क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण कारणीभूत आहे, असे प्रशिक्षक अविनाश पवार यांनी सांगितले.

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
संपादक मंडळ : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०